हॅप्पी बर्थडे

विजया राजाध्यक्ष
लेखिका

जितेंद्र आव्हाड
माजी मंत्री

प्रशांत ठाकूर
आमदार

काजोल
अभिनेत्री

जेनेलिया डिसूझा-देशमुख
अभिनेत्री

व्यंकटेश प्रसाद
माजी क्रिकेटपटू

भरत शहा
निर्माता

बरखा रॉय
दिग्दर्शिका

वत्सल सेठ
अभिनेता

सिद्धार्थ मोकळे
आत्मभान संघटना

|| पंचांग ||

आज मिती श्रावण शुद्ध अष्टमी शके १९४४. चंद्र नक्षत्र स्वाती, योग शुभ, चंद्र रास तूळ. भारतीय सौर १४ श्रावण शके १९४४. शुक्रवार दिनांक ५ ऑगस्ट २०२२
मुंबईचा सूर्योदय ०६.९३
मुंबईचा सूर्यास्त ०७.०७
मुंबईचा चंद्रोदय १२.३३,
मुंबईचा चंद्रास्त ००.१२
उद्याची, राहू काळ ११.०३ ते १२.४०

|| भविष्य ||

मेष - परदेशातून काही शुभ संदेश येण्याची शक्यता आहे.
वृषभ - आर्थिक प्रश्न सुटणार आहेत.
मिथुन - व्यापार व्यवसायात लक्ष देणे फार गरजेचे आहे.
कर्क - आजचा दिवस आपणासाठी फार अनुकूल नाही.
सिंह - आजचा आपला दिवस फार धावपळीचा जाऊ शकतो.
कन्या - आर्थिक उत्पन्नात चांगली वाढ होईल.
तूळ - कुटुंबातील आयुष्य समाधानी असेल.
वृश्चिक - आपण सातत्याने काम केल्यास कामामध्ये यश.
धनू - आज आपण कोणाच्याही सहकार्याची अपेक्षा करू नका.
मकर - आपल्या वाणप्याने शत्रू नामोहरम होणार आहेत.
कुंभ - नवीन संधीचा फायदा घ्या.
मीन - अवघड परिस्थितीला चांगले सामोरे जाणार आहात.

चला, हसूया!

योगेश पहिल्यांदाच मुलगी बघायला गेला.
मुलीचा बाप : बेटा, दारू पितोस का?
योगेश : ते नंतर, आधी पोहे, चहा आणि मुलगी बघणे तर होऊ द्या. मग बसू!

अळीमिळी

शांतता कोर्ट...

कुणा मंत्रीपदाची आशा आहे,
कुणा डोलारा पडेल वाटत आहे...
पण सारेच 'स्तब्ध' कारण,
शांतता कोर्ट चालू आहे...
- उत्तम पिंगळे

सुमती शंकर भानू यांचे वृद्धापकाळाने निधन

नाशिक : येथील रहिवासी सुमती शंकर भानू (९६) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुली, जावई, सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. द्वारका येथील अमरधाममध्ये पार्थिवावर शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांचे आप्तस्वकीय आणि नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आफ्रिकन स्वाइन फीवरविषयी केंद्र शासनाचे राज्यांना सतर्कतेचे आदेश

मुंबई (प्रतिनिधी) :

देशातील पूर्वोत्तर राज्यांत तसेच उत्तर प्रदेश व बिहार या राज्यामध्ये वराह प्रजातीत 'आफ्रिकन स्वाइन फीवर' या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याचे निष्पन्न झालेले आहे. यानुसार केंद्र शासनाने या राज्यांना जैव सुरक्षा, उपाययोजना करणे, प्रतिबंधात्मक कार्यवाही करणे तसेच प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. तसेच इतर राज्यांनाही सतर्कतेचे आदेश दिले आहेत.

'आफ्रिकन स्वाइन फीवर' हा वराहमधील विषाणूजन्य रोग आहे. हा आजार एस्फीव्हायरस या विषाणूमुळे होतो. सर्व वराह प्रजातींमध्ये (पाळीव व जंगली) याचा प्रादुर्भाव दिसून येतो. या रोगामुळे बाधित वराहांची मोठ्या प्रमाणात मर्तुक होते. त्यामुळे वराह पालन करणाऱ्या पशुपालकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते. हा आजार वराहापासून मानवाला किंवा इतर प्राण्यांना होत नाही. त्यामुळे हा आजार सार्वजनिक आरोग्यास धोकादायक नाही. महाराष्ट्र राज्यात २०व्या पशुगणनेनुसार १,६१,००० वराह संख्या आहे. राज्यात वराहांची संख्या मर्यादित असलेल्या आणि या रोगाची बाधा इतर पशुधनास होत नसल्यामुळे पशुपालकांनी घाबरून जाऊ नये.

'आफ्रिकन स्वाइन फीवर' या आजाराचा प्रसार बाधित व मृत वराहाच्या रक्त, उती, स्राव आणि विष्ठेमधून होतो. बाधित वराह निरोगी वराहाच्या संपर्कात आल्यास रोगाची लागण होऊ शकते. आजारातून बरे झालेले वराह विषाणूचे वाहक असतात. त्याचप्रमाणे या रोगाच्या विषाणू बाधित वाहने, कपडे, भांडी, साधनसामुग्री आणि पादत्राणे यामुळे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी विषाणूचा प्रसार होऊ शकतो. Omithiodoros या प्रजातीतील गोचीडाद्वारे या विषाणूचा प्रसार होतो. 'आफ्रिकन स्वाइन फीवर' या रोगावर प्रभावी औषधोपचार अथवा लसमात्रा उपलब्ध नाही. घरगुती तसेच हॉटेलमधील वाया गेलेले, शिल्लक राहिलेले अन्न वराहांना देणे ही बाब विषाणूच्या प्रसारास मुख्यत्वेकरून कारणीभूत असल्याने अशा प्रकारचे खाद्य देणे टाळणे गरजेचे आहे. असे करणे अवघड असल्यास मांसविरहित (शाकाहारी) अन्न २० मिनिटांपेक्षा जास्त वेळ उकळवून द्यावे. निरोगी वराहाचे घरगुती व कत्तलखान्यातील कच्चे मांस, उपपदार्थ तसेच कचरा यांच्याशी संपर्क येऊ देऊ नये. वराहपालन केंद्रातील तसेच वराह मांस विक्री केंद्रातील कचरा एकत्रित साठवून ठेवू नये. सर्व कचरा (Waste) नष्ट करावा अथवा त्याची सार्वजनिक कचरा व्यवस्थापनाकडून शास्त्रोक्तदृष्ट्या योग्य रितीने विल्हेवाट लावावी.

प्रभावी जैव सुरक्षा नियमांचा अवलंब, बाधित क्षेत्रात वराह तसेच वराहजन्य पदार्थांच्या वाहतुकीवर प्रतिबंध आणि बाह्य कीटकांचे नियंत्रण करून या रोगाचे नियंत्रण करता येईल, अशी माहिती राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त डॉ. डी. डी. पारकाळे यांनी दिली आहे.

'घरोघरी तिरंगा' अभियानांतर्गत प्रदर्शन केंद्राचे मंत्रालयात उद्घाटन

मुंबई (प्रतिनिधी) :

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात यावर्षी राज्यात 'घरोघरी तिरंगा' अभियान राबविण्यात येत असून, या अभियानात राज्यातील सर्व जनतेने हिरीरीने भाग घ्यावा, असे आवाहन मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांनी केले. शासनाने यासाठी अतिशय सूक्ष्म नियोजन केले असल्याचेही मुख्य सचिवांनी यावेळी सांगितले. मंत्रालयात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) मार्फत उभारण्यात आलेल्या प्रदर्शन व विक्री स्टॉलचे मुख्य सचिवांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

उद्घाटनप्रसंगी ग्रामविकास विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे अपर मुख्य सचिव तथा महासंचालक दीपक कपूर, उमेदचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. हेमंत वसेकर, ग्रामविकास विभागाचे उपसचिव प्रविण जैन, अतिरिक्त संचालक परमेश्वर राऊत आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत पालघर जिल्ह्यातील प्रभाग संघाच्यावतीने मंत्रालयात तीन दिवसांकरिता 'घरोघरी तिरंगा' या अभियानांतर्गत प्रदर्शन व विक्री केंद्र उभारण्यात आले आहे. विशेष म्हणजे मंत्रालयातील स्टॉल हे महिला बचत गटातील आदिवासी महिलांचे आहेत. हे प्रदर्शन सोमवार ८ ऑगस्ट २०२२ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत सुरू असणार आहे. या प्रदर्शनात राष्ट्रीय तिरंगा ध्वजासह स्वातंत्र्य दिनाच्या आनुषंगाने विविध वस्तू देवण्यात आल्या आहेत. 'घरोघरी तिरंगा' अभियानात राज्यातील महिला बचत गटाच्या सर्व महिला सहभागी असून या बचत गटातील महिला तिरंगा ध्वजाची निर्मिती आणि विक्रीही करीत आहेत. शासनाने या संपूर्ण अभियानाकरिता ग्रामविकास विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार यांची नोडल ऑफीसर म्हणून नियुक्ती केली आहे.

पोस्ट ऑफिसच्या काऊंटरवर राष्ट्रध्वज विक्रीसाठी उपलब्ध

मुंबई (प्रतिनिधी) :

आझादी का अमृत महोत्सवाच्या अंतर्गत भारत सरकारने २०२२च्या स्वातंत्र्यदिनी नागरिकांना भारताचा राष्ट्रध्वज त्यांच्या घरात फडकवण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी आणि त्याद्वारे त्यांच्यात देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी तसेच ज्यांनी राष्ट्र उभारणीसाठी अथक परिश्रम घेतले त्यांच्या योगदानाची आठवण करावी म्हणून "हर घर तिरंगा" मोहीम सुरू केली आहे. १३ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत सर्व नागरिकांना त्यांच्या घरी तिरंगा फडकवण्यासाठी प्रोत्साहित केले जावे, अशी परिकल्पना करण्यात आली आहे. टपाल विभागासाठी हा अभिमानाचा क्षण आहे की, देशाच्या कानाकोपऱ्यात पसरलेले पोस्ट कार्यालयांचे विशाल जाळे आणि कर्मचारी, नागरिकांना या महत्त्वपूर्ण प्रसंगाचे महत्त्व मोठ्या प्रमाणावर सांगण्यासाठी या मोहिमेद्वारे उपयोगात आणले जात आहेत. या मोहिमेअंतर्गत पोस्ट ऑफिसच्या काऊंटरवर प्रति ध्वज रु. २५ याप्रमाणे राष्ट्रध्वज विक्रीसाठी उपलब्ध आहेत. राष्ट्रध्वज epost-office@indiapost.gov.in वरही ऑनलाइन ऑर्डर करता येतील. नागरिकांनी राष्ट्रध्वज खरेदी करण्यासाठी जवळच्या पोस्ट ऑफिसशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र परिचय केंद्र, दिल्ली येथील वादनालयाला भाष्य प्रकाशनाचे संचालक महेश भारतीय यांनी भेट दिली. ग्रंथपाल रामेश्वर बर्डे आणि महाराष्ट्र परिचय केंद्राचे कमलेश पाटील यांनी त्यांचे स्वागत केले.

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक

नोंदणीकृत कार्यालय : झेप गार्डन, नं. २७, ३ रा रा क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरमंगला, बेंगळूरु - ५६००९५, कर्नाटक.
प्रादेशिक कार्यालय : ७ वा मजला, अलार्पाई आयटी पार्क, अ. क्र. ८, खरडी - मुंबई बायपास, गाव खरडी, पुणे - ४११०१४.

लिलाव पूर्वे ढकलल्याची सूचना

सदर वर्तमानपत्रात दि. २५.७७.२०२२ रोजी प्रसिद्ध झालेल्या लिलाव विक्री सूचनेचा संदर्भ पहा ज्यामध्ये सरफैसी अंतर्गत स्थावर मालमत्तांची विक्री दि. ३१.०८.२०२२ रोजी उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडद्वारे निश्चित करण्यात आली होती. सदर दिवशी गणेशोत्सवानिमित्ताने सार्वजनिक सुट्टी असल्याने लिलाव दिनांक ३१.०८.२०२२ ऐवजी दि. ०१.०९.२०२२ अशी पुनःनिर्धारित करण्यात आली आहे. सर्वांना कृपया लिलाव दिवसातील बदलेली नोंद घ्यावी. लिलाव विक्रीच्या उर्वरित सर्व अटी व शर्ती अपरिवर्तित राहतील.

दिनांक : ०४.०८.२०२२,
ठिकाण : मुंबई
सही/-
प्राधिकृत अधिकारी

ठाणे महानगरपालिका, ठाणे

सा.बां. विभाग
निविदा सूचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिवा प्रभाग समिती क्षेत्रातील "स्मशानभुमी दुरुस्ती" या लेखाशिर्षकां तील महानगरपालिका क्षेत्रातील दिवा प्रभाग समिती मधील प्र.क्र. २९ मधील तळेपाडा स्मशानभुमीची संरक्षक भिंत बांधणे या कामाकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुद्ध शासकीय/निमशासकीय /सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ.यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रदद करण्याची कार्यवाही केली/सुरू आहे, अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सूचना व निविदा प्रपत्र संकेतस्थळ www.mahatenders.gov.in वर दि. ०५.०८.२०२२ ते दि. १९.०८.२०२२ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे दि.१९.०८.२०२२ रोजी सायं. ९६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदरची निविदा दि. २२.०८.२०२२ रोजी १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधींसमक्ष ऑनलाईन पध्दतीने उघडण्यात येतील.

ठामपा/पीआरओ/पिडब्ल्यूडी-दिवा/४३२/२२-२३ सही/-
दि:०४.०८.२०२२ कार्यकारी अभियंता
plsvisitourofficialweb-site ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in
"कोविड लसीकरण अमृत महोत्सव"
बुस्टर डोस घ्या ..व सुरक्षित रहा !

जाहिर समन्स

वादीतर्फे वकिल श्री. अेस. अेस. सावंत
कुडाळ येथील मे. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांचे न्यायालयात
रे.दि.मु.नं. ४३/२०१२
नेमली तारीख - १२/०९/२०२२
निशाण क्रमांक - २५५
श्री. सिताराम साबा सकपाळ ---------- **वादी**
विरुद्ध
श्री. तानाजी सिताराम पंढारे ---------- **प्रतिवादी**

प्रति,
प्रतिवादी नं. २८व) श्री. संजय रामचंद्र शिंदे,
वय सु. ४२ वर्षे, धंदा-शेती,
प्रतिवादी नं. २८क) प्रभावती रामचंद्र पंढारे,
वय सु. ५५ वर्षे, धंदा - शेती,
रा. बालगोपाळ जनरल स्टोअर्स, सिध्दार्थनगर, कार्डीनल हायस्कूलच्या मागे, टिचर्स कॉलनीजवळ, वांद्रे पूर्व मुंबई ४०००५१.

ज्याअर्थी या दाव्यात नमूद केलेल्या आपल्या उपरोल्लेखित पत्यावर आपणास यापूर्वी काढलेली समन्से ही प्रतिवादी नं. २८व व प्रतिवादी नं. २८क यांचे रिपोर्ट रेकॉर्डवर येवून आपणांस काढलेली समन्से न बजावता परत आलेली आहेत. तरी सदर दाव्याची समन्से बजावणी होणे करीता वर्तमानपत्रामध्ये जाहीर समन्स देणे आवश्यक बनलेले आहे.

त्याअर्थी या जाहिर समन्सान्वये आपणास असे फर्मावि ण्यात येते की, आपण या दाव्याच्या पुढील नेमलेल्या दिनांक - १२/०९/२०२२ रोजी ठिक १०.३० वाजता या न्यायालयात आपण स्वत अगर कायदेशिररित्या नियुक्त केलेल्या आपल्या प्रतिनिधीमार्फत हजर राहून आपले योग्य ते म्हणणे व बाजू मांडावयाची आहे. तसे करण्यास आपणाकडून कसूर झाल्यास याकामी पुढील योग्य ते आदेश करण्यात येतील याची समज घ्यावी. म्हणून काढले समन्स माझ्या साहिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

दिनांक - ३०/०६/२०२२

तयार करणार		आदेशावरुन
सही/-	शिक्का	सही/-
(अे. अे. जाधव)		(अेम. जी. जाधव)
वरिष्ठ लिपीक,		सहाय्यक अधीक्षक, (अास्थापना)
दिवाणी न्यायालय, (क. स्तर) कुडाळ		दिवाणी न्यायालय, (क. स्तर) कुडाळ

केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या अध्यक्षपदी माजी न्यायमूर्ती रणजित मोरे

नवी दिल्ली (प्रतिनिधी) :

केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या (कॅट) अध्यक्षपदी महाराष्ट्राचे सुपुत्र आणि मेघालय उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश रणजित वसंतराव मोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मूळचे सातारा जिल्ह्यातील खटाव तालुकामधील निमसोड येथील आहेत. मोरे यांचे प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण निमसोड येथे झाले. त्यानंतर त्यांनी पदवीचे शिक्षण कोल्हापूर येथून पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी विधीचे शिक्षण सांगलीत घेतले. १९८३ मध्ये त्यांनी माजी न्यायाधीश ए. पी. शहा यांच्याकडे अधिवक्ता म्हणून कामाला सुरुवात केली. नंतर मुंबई उच्च न्यायालयातही त्यांनी अधिवक्ता म्हणून काम केले. अनेक शासकीय संस्थांचे अधिवक्ता म्हणून सरकारची बाजू त्यांनी मांडली. वर्ष २००६ मध्ये मोरे यांची मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. वर्ष २०२० मध्ये मेघालय येथील उच्च न्यायालयात आधी न्यायाधीश म्हणून, तर वर्ष २०२१ मध्ये मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. ३० जुलै २०२२ पासून त्यांनी केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण येथील अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली. न्यायाधिकरणाची स्थापना राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२३-अ अन्वये सार्वजनिक सेवा आणि पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या सेवेच्या अटींशी संबंधित विवाद आणि तक्रारींच्या निवाड्यासाठी प्रशासकीय न्यायाधिकरण अधिनियम, १९८५ च्या नुसार करण्यात आली.

ॲमेझॉन रिटेल इंडियाचे कुंजीरवाडी येथे नवे शेतकरी संकलन केंद्र

मुंबई (प्रतिनिधी) :

शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी आणि ग्राहकांना उच्च दर्जाची ताजी फळे आणि भाज्या देण्याच्या सतत प्रयत्नात, ॲमेझॉन रिटेल इंडियाने महाराष्ट्रातील कुंजीरवाडी येथे ५वे शेतकरी संकलन केंद्र सुरू केले. ॲमेझॉन रिटेल इंडियाची महाराष्ट्रात मंचर, नाशिक, वाई आणि रत्नागिरी यासह इतर चार शेतकरी संकलन केंद्रे आहेत आणि स्थानिक पातळीवर पिकवलेली फळे आणि भाजीपाला मिळवण्यासाठी महाराष्ट्रात ४५००हून अधिक शेतकरी आणि शेतकरी उत्पादक संस्था (FPOs) यांचे नेटवर्क आहे. ही संकलन केंद्रे शेतकऱ्यांना जलद पेमेंट, वाजवी किंमत आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेतीचे उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न करत आहेत.

कुंजिरवाडी येथील नवीन संकलन केंद्र हे जलद-विस्तारित उत्पादन मूल्य साखळीत एक भर असेल आणि ग्राहकांना विविध प्रकारच्या उच्च-गुणवत्तेची फळे आणि भाज्या सेंद्रिय, विदेशी, हंगामी आणि पालेभाज्या) देईल. ॲमेझॉन रिटेल इंडियाचे कँटेगरी लीडर राजेश प्रसाद म्हणाले, "संपूर्ण प्रदेशातील स्थानिक शेतकऱ्यांना ऑनलाइन मार्केटमधील संधीचा लाभ घेण्यास सक्षम करणे आणि वेगवान डिजिटल अर्थव्यवस्थेचा एक भाग बनणे हे आमचे ध्येय आहे. ही सुरुवातीमुळे आणि महाराष्ट्रात आमच्या शेतकरी संकलन केंद्राच्या नेटवर्कच्या विस्तारामुळे आम्ही १२० हून अधिक ठिकाणांमधून ताजी आणि सर्वोत्तम दर्जाची प्रादेशिक फळे आणि भाजीपाला थेट शेतातून खरेदी करू आणि आमच्या ग्राहकांपर्यंत पोहोचवू. आमची संकलन केंद्रे ही खरेदीच्या पलीकडे सेवांचा विस्तार करण्यासाठी नोडल पॉइंट आहेत, ज्यामध्ये विविध प्रशिक्षण कार्यक्रम, शेतकऱ्यांची उत्पादकता वाढवण्यासाठी कृषी इनपुट सपोर्ट देणे, ज्ञान शेयर करणे आणि तंत्रज्ञानाचा अवलंब करणे या बाबी समाविष्ट आहेत." स्वतःचा अनुभव सांगत महाराष्ट्रामधील आंबेगाव, पुणे येथील कळंब गावातील आमची एक महिला शेतकरी म्हणाल्या, "मी २०२० पासून ॲमेझॉन रिटेलच्या कलेक्शन सेंटरशी संबंधित आहे आणि नियमितपणे फुलकोबी, कोबी, मिरची आणि धणे यांचा पुरवठा करत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका

मुख्य अभियंता (एस.ओ.) विभाग
No. E.E.M./Sew/2924 City- 1 दि. ०३.०८.२०२२
ई - निविदा सूचना

बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त खालील ऑनलाइन निविदा आमंत्रित करतात निविदेची प्रत एम.सी.जी.एम.च्या पोर्टलवरून (**http://www.mcgm.gov.in**) "ई-प्रापण" विभागांतर्गत डाउनलोड केली जाऊ शकते.

अ. क्र.	कामाचे नाव	निविदा संदर्भ क्र.	ईरठे रु.	ई-निविदा किंमत रु.	निविदा देय तारीख
१	दादर पंपिंग स्टेशनवर सर्व उपकरणे आणि नियंत्रण पॅनेलसह सबमर्सिबल पंप सेटची एसआयटीसी.	बोली क्रमांक ७२०००३४७१२	१९,८००/-	२,२००/- + १८% जीएसटी	२२.०८.२०२२ दुपारी ०४.०० वा.

अधिक माहितीसाठी **www.mcgm.gov.in** वर लॉग इन करा.

सही/-
(ए. एस. भुरके)
पीआरओ/९८०/जाहि./२०२२-२३ **कार्यकारी अभियंता मेक. (Sew.) शहर-१**

जेथे जेथे पाणी साचते, तेथे तेथे दासांचे फावते.

बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. डीवाय.सीएच.ई./ओ अँन्ड एम/ईटी - २२/एसडब्ल्यूडी, दि. ०४.०८.२०२२

बृहमुंबई महानगरपालिका
ई-निविदा सूचना

विभाग :	मुख्य अभियंता (एसडब्ल्यूडी)
उपविभाग :	उपमुख्य अभियंता (ओ अँन्ड एम) एसडब्ल्यूडी
विषय :	जी दक्षिण प्रभागातील एमआरटीएस परिसरामध्ये एसडब्ल्यूडी लाईनवर खराब झालेले एम.एस. अँसिस शाफ्ट बदलण्याचे काम. **बोली क्र. ७२०००३४८०१**
ई निविदा विक्री :	दि. ०४.०८.२०२२ वेळ: ११.०० वा.पासून दिनांक: १२.०८.२०२२ वेळ: १२.०० वा.पर्यंत
वेबसाइट :	https/portal.mcgm.gov.in
नाव :	श्री. विजय गोतार्ण, कार्यकारी अभियंता (ओ अँन्ड एम) यांत्रिकी, एसडब्ल्यूडी
दूरध्वनी क्रमांक (कार्यालयीन) :	०२२-२४३०९८७७, ०२२-२४३०९४७२
मोबाइल क्रमांक :	९८१९७६६३४७
ई-मेल पत्ता :	eecomcity01.swd@mcgm.gov.in

सही/-
कार्यकारी अभियंता (ओअँन्डएम)
पीआरओ/९९५/जाहि./२०२२-२३ **(यांत्रिकी) स्टॉर्म वॉटर ड्रेन्स**

थोडासाही ताप येता, डॉक्टरांना जाऊन भेटा.

सौर रूफटॉप योजनेतील अर्ज प्रलंबित राहिल्यास संबधितांवर कारवाई

मुंबई (प्रतिनिधी) :

सौर रूफटॉप योजनेअंतर्गत आलेल्या अर्जाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून ग्राहकाला याचा लाभ घेता येईल, असे नियोजन प्रत्येक उपविभागीय कार्यालयाने करावेत. या कामात हयगय करणाऱ्या एजन्सींवर, तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होऊ शकते, असा इशारा महावितरणचे संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांनी गुरुवारी भांडुप येथील रूफटॉप सौरऊर्जाबाबत घेतलेल्या बैठकीत सांगितले.

महावितरणच्या छतावरील (रूफटॉप) सौरऊर्जा निर्मिती योजना बसविण्यासाठी केंद्र शासनाकडून ४० टक्क्यांपर्यंत अनुदान मिळत आहे. सौरऊर्जा निर्मिती यंत्रणेमुळे मासिक घरगुती वीजबिलात मोठी बचत होऊन, तर नेटमिटरिंगद्वारे महावितरणकडून वर्षाअखेर शिल्लक वीजदेखील विकत घेतली जाते. या योजनेची योग्य अंमलबजावणी होण्यासाठी महावितरणचे संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांनी भांडुप परिमंडलातील ठाणे व वाशी मंडळातील अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपविभागीय अभियंता, टोरेंट पॉवरचे अधिकारी तसेच या योजनासाठी नेमलेली एजन्सीच्या प्रतिनिधींसोबत आढावा बैठक घेतली. या बैठकीत मुख्य अभियंता, भांडुप परिमंडल धनंजय औंढेकर सोबत मुख्यालयाचे मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प), चंद्रमणी मिश्रा, भांडुप परिमंडलाच्या अधीक्षक अभियंता, पायाभूत आराखडा शुभांगी कटकधोंड, वाशी मंडळाचे अधीक्षक अभियंता राजाराम माने, ठाणे मंडळाचे अधीक्षक अभियंता अरविंद बुलवुले व इतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, या योजनेचा लाभ घेऊन ग्राहक पर्यावरण संरक्षणात हातभार लाऊ शकतो. त्याचबरोबर ग्राहकाला वीजबिलसुद्धा कमी येते. ज्यामुळे, रोहित्रावरचा ताण कमी होऊ शकते. ही योजना सगळ्यांसाठी फायद्याची असून या योजनेला जास्तीत जास्त ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रत्येक मंडळ, विभागीय, उपविभागीय कार्यालय तसेच एजन्सीने भरपूर प्रयत्न करावेत. हाऊसिंग सोसायटीस व अशा इतर ठिकाणी कॅम्प घेऊन सदर योजनेबाबत सविस्तर माहिती ग्राहकांना द्यावीत. याशिवाय, झोपडपट्टी असलेल्या भागात जनजागृती केल्यास वीजबिल कमी येऊन याचा फायदा तेथील ग्राहकांनासुद्धा होऊ शकतो.

या योजनेमधून घरगुती वर्गवारीतील ग्राहकांना किमान एक किलोवॅट क्षमतेची छतावरील (रूफटॉप) सौरऊर्जा निर्मिती यंत्रणा बसविण्यासाठी केंद्र शासनाकडून वित्त सहाय्य देण्यात येणार आहे. रूफटॉप सौर योजनेमधून घरगुती ग्राहकांसाठी अटी व शर्तीसह १ ते ३ किलोवॅटपर्यंत ४० टक्के आणि ३ किलोवॅटपेक्षा अधिक ते १० किलोवॅटपर्यंत २० टक्के अनुदान देण्यात येते. तसेच सामूहिक वापरासाठी ५०० किलोवॅटपर्यंत; परंतु प्रत्येक घरासाठी १० किलोवॅट मर्यादेसह गृहनिर्माण रहिवासी संस्था व निवासी कल्याणकारी संघटना ग्राहकांना २० टक्के अनुदान मिळणार आहे.